# ५. फुलपाखरू

- ऐकूया. गाऊया.



फुलांच्या दुनियेत
फुलपाखरू दंग
हळूच टिपते
फुलांचे रंग...

फुलावर बसते
खुदकन हसते
फुलांचे रंग
पंखांना फासते...

निळसर-जांभळे
ठिपके छान
सोनेरी रंगाची
सुंदर कमान...

फुलांच्या दुनियेत
फुलपाखरू दंग
पंखांना त्याच्या
फुलांचे रंग...

– दादासाहेब कोते

## वर्गकार्य

- कसे ते लिही.

(अ) फुलपाखरू रंग टिपते. –............ (आ) फुलपाखरू हसते. –.............

- कोठे ते लिही.

(अ) फुलपाखरू दंग होते. –............. (आ) फुलपाखरू बसते. –.............

- प्रत्येक रंगाच्या वस्तूचे नाव लिही.

निळा............ हिरवा............
पिवळा............ लाल ............
पांढरा ............ काळा ............

XG17J2